**MHBI060000132025**

नियमीत दिवाणी दावा क्र. ०२/२०२५
तुळसाबाई सोनपीर व ईतर -वि- सुनंदा चाटे व ईतर
**CNR No : MHBI060000132025.**

नि.क्र. २८ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा दावा हा घोषणेबाबत व निरंतर मनाई हुकुमाबाबत दाखल केलेला आहे.

आज वादीतर्फे कनिष्ठ विधीज्ञांनी नि.क्र. २८ अन्वये या न्यायालयात अर्ज दाखल करुन नि.क्र. १५ अन्वये दिनांक १८/०२/२०२५ रोजी झालेले जैसेथे परिस्थीतीचा आदेश कायम करावा असा अर्ज दाखल केला. तसेच वादीतर्फे कनिष्ठ विधीज्ञांनी पुढील तारखेपावेतो सदरचा आदेश कायम करावा असे न्यायालयासमोर युक्तीवाद केला. प्रस्तुतचे प्रकरण हे ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयामध्ये दाखल असुन आज रोजी या न्यायालयासमोर प्रभारी न्यायालय या नात्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला होता. या न्यायालयाकडे ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या न्यायालयाचा चार्ज आजपावेतो असल्याने नि.क्र. २८ वरील अर्ज हा नियमीत न्यायालयासमोर पुढील आदेशकरीता ठेवणेकामी उद्या दिनांक ३०/०९/२०२५ रोजी ठेवावा असे सांगुन नि.क्र. २८ वर पेनाने put up before proper court असा आदेश केला. त्यानंतर वादीतर्फे जेष्ठ विधीज्ञ श्री आर. एस. डिघोळे यांनी युक्तीवाद करुन प्रस्तुतच्या अर्जावर जैसेथेचा आदेश न दिल्यास नि.क्र. १५ वरील आदेश हा रद्दबातल होईल असा युक्तीवाद केला.

श्री आर. एस. डिघोळे यांचा युकतीवाद ऐकला.

प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले. वादीने नि.क्र. १५ अन्वये अर्ज दाखल करुन, प्रतिवादीने नि.क्र. ५ वरील अर्जावरील अंतिम आदेश होईपावेतो अथवा लेखी कैफीयत दाखल करेपावेतो दावा मिळकतीची जैसेथे (status-quo) परिस्थीती ठेवावी असा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर प्रतिवादीचे म्हणणे घेऊन मुळ दावा व नि.क्र. ५ वरील अर्जास प्रतिवादीतर्फे लेखी कैफीयत व म्हणणे दाखल होईपावेतो दावा मिळकतीची जैसेथे परिस्थीती ठेवण्याबाबत दिनांक १८/०२/२०२५ रोजी

आदेशीत केले होते. त्यानंतर प्रतिवादीतर्फे नि.क्र. १९ अन्वये रक्कम रु. २००/- खर्चापोटी दिनांक २६/०६/२०२५ रोजी प्रतिवादीविरुध्द विना कैफीतयतीचा झालेला आदेश रद्द केला होता. दिनांक २६/०६/२०२५ रोजी नि.क्र. २१ अन्वये वादीतर्फे नि.क्र. १५ वरील जैसेथेचा आदेश पुढील तारखेपावेतो सुरु ठेवणेबाबत अर्ज केला होता व सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केला होता. त्यानंतर वादीने दिनांक २९/०७/२०२५ रोजी नि.क्र. २२ अन्वये अर्ज दाखल करुन युकतीवादाकामी मुदत मागितली होती व न्यायालयाने वादीचा सदरचा अर्ज मंजुर केला होता. नि.क्र. २३ अन्वये वादीने दिनांक २९/०७/२०२५ रोजी अर्ज दाखल करुन नि.क्र. १५ वरील आदेश पुढे सुरु ठेवण्याची विनंती केली होती व सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केला होता. त्यानंतर नि.क्र. २५ अन्वये वादीने नि.क्र. १५ वरील आदेश पुन्हा पुढे सुरु ठेवण्यासंदर्भात अर्ज केला होतो व न्यायालयाने तो दिनांक २९/०८/२०२५ रोजी मंजुर केला होता. त्यानंतर वादीने नि.क्र. २७ अन्वये पुन्हा अर्ज दाखल करुन नि.क्र. १५ वरील आदेश पुढे सुरु ठेवण्यात यावा असा अर्ज दाखल केला व सदरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केला होता.

दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९ नियम ३ए नुसार मनाई हुकुमाचा अर्ज हा विशेष कारणाशिवाय ३० दिवसांमध्ये निकाली काढण्याचा प्रयत्न करावा असे नमुद करण्यात आलेले आहे. नि.क्र. १५ अन्वये न्यायालयाने लेखी कैफीयत होईपावेतो दावा मिळकतीची जैसेथे परिस्थीती ठेवावी असा आदेश केला होता. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतच्या दाव्यामध्ये नि.क्र. १६ अन्वये दिनांक ०७/०४/२०२५ रोजी दाव्यास व नि.क्र. ५ च्या अर्जास लेखी कैफीयत दाखल केलेली आहे. तसेच नि.क्र. २४ अन्वये प्रतिवादी क्र. ४ यांनी देखील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची लेखी कैफीयत दिनांक २६/०६/२०२५ रोजी स्वीकृत (adopt) केलेली आहे. अशा परीस्थीतीमध्ये नि.क्र. १५ वरील आदेश हा नि.क्र. २१, २३, २५ व २७ वरील आदेशाप्रमाणे पुढे सुरु ठेवण्यात आलेला आहे. वास्तविकत: नि.क्र. १५ वरील आदेश हा प्रतिवादींची लेखी कैफीयत व तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जास लेखी खुलासा दाखल होईपावेतो करण्यात आलेला होता.

नि.क्र. २८ वरील प्रस्तुतच्या अर्जात नि.क्र. १५ वरील जैसेथेचा आदेश पुढे सुरु ठेवण्यास कोणती विशेष परिस्थीती निर्माण झाली याबाबत काहीही नमुद करण्यात आलेले नाही. दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९ नियम ३ए अन्वये मनाई हुकुमाचा आदेश

हा कुठल्याही विशेष कारणाशिवाय ३० दिवसांमध्ये निकाली काढण्याचा प्रयत्न करणे अपेक्षीत आहे. अशा परिस्थीतीत नि.क्र. १५ वरील आदेश हा केवळ लेखी कैफीयत व लेखी खुलासा येईपावेतो देण्यात आलेला होता. परंतु नैसर्गीक न्यायाच्या तत्वांनुसार नि.क्र. २८ वरील वादीचा अर्ज हा दिनांक ०१/१०/२०२५ पावेतो वादीने मागणी केल्याप्रमाणे नि.क्र. १५ वरील जैसेथेचा आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2025.09.29 17:22:43 +0530

दिनांक: २९/०९/२०२५
अंबाजोगाई

**(प्रविण प्र. सागडे)**
प्र. ३रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
अंबाजोगाई, जि. बीड.

:: <u>Certificate of Stenographer</u> ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment."

Dictated On : 29/09/2025.
Transcribed On : 29/09/2025.
Checked & Signed On : 29/09/2025.

Digitally signed by AKASH BASAVRAJ KABNE
Date: 2025.09.29 17:24:23 +0530

Date : 29/09/2025.
Place : Ambajogai.

**( Akash Kabne )**
Stenographer (Grade – 3)
Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai.